“महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मूल्ये विकसन कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकता” - एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत शिक्षणशास्त्र

विद्याशाखेत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता

सादर करावयाचा संशोधन आराखडा.

संशोधक

इशान रामराव सरवदे

मार्गदर्शिका

डॉ· विशाखा पांडूरंग म्हस्के

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ· नांदेड·

सप्टेंबर· 2022.

अनुक्रमणिका

अ·क्र·	घटक	पान क्र·
1	प्रस्तावना	3
2	संशोधनाची गरज	4
3	संशोधनाची महत्त्व	5
4	संशोधन विधान	5
5	कार्यात्मक व्याख्या	6
6	संशोधनाची उद्दिष्टे	6
7	संशोधनाची गृहितके	7
8	संशोधन परिकल्पना	8
9	शुन्य परिकल्पना	8
10	संशोधनाची व्याप्ती	8
11	संशोधनाची मर्यादा	9
12	परीमर्यादा	9
13	संशोधनाशी निगडीत चले	10
14	संशोधन पद्धती	10
15	संशोधनाची जनसंख्या	11
16	नमुना व नमुना निवड पद्धती	11
17	संशोधनाची साधने व तंत्रे	12
18	सांख्यिकीय परिमाणे	12
19	संशोधनाची कार्यवाही	12
20	प्रकरणीकरण	13
21	वेळापत्रक	13
22	अंदाजपत्रक	14
23	संदर्भ ग्रंथ सूची	15

1. प्रस्तावना :-

निसर्गाने दिलेली शिदोरी घेवून जगात केलेली वाटचाल म्हणजे व्यक्तिमत्त्व अशी जे.बी. वॅटसन यांनी व्यक्तिमत्त्वाची व्याख्या केली आहे. जीवनाची ही वाटचाल चालू असताना व्यक्तीला सभोवतालच्या परिस्थितीशी मिळते जुळते घ्यावे लागते म्हणजेच समायोजन साधावे लागते. जीवनाची व्याख्या "Life is an adjustment" म्हणजेच जीवन ही एक तडजोड आहे अशी केली जाते. परिस्थितीशी व्यक्तीचे समायोजन झाले तर व्यक्तीचे मन निरोगी राहत असते. समायोजन म्हणजे परिस्थितीशी समाजमान्य प्रकारांच्या सहाय्याने जुळवून घेणे. जो व्यक्ती जीवनात समायोजन साधू शकतो तोच जीवनात यशस्वी होत असतो. महाविदयालयीन विदयार्थ्यांना देखील सध्याच्या धावपळीच्या जीवनात पावलोपावली समायोजन साधण्यास सक्षम बनवणे व त्यांना विषमसमायोजन होण्यापासून दूर करणे महत्वाचे ठरते.

आजच्या स्पर्धेच्या युगात ताणतणाव ही सर्वांच्याच अनुभवाची बाब झाली आहे. फारच थोडया व्यक्ती ताणतणावांचे चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करताना दिसतात. ताणाशी योग्य प्रकारे जुळवून न घेता आल्यामुळे जीवनातील आनंद, स्वास्थ्य हरवलेल्या व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. शैक्षणिक जीवनात पण विद्यार्थ्यांना ताणतणावांचा सामना करावा लागत आहे. या ताणतणावांना सामोरे न जाता आल्यामुळे अनेक चुकीच्या दिशेने भरकटलेले दिसून येतात. त्यांना जीवनात निर्माण होणा-या ताणतणावांना प्रभावीपणे सामोरे जाता येणे, त्यांचे योग्य मार्गाने व्यवस्थापन करून ताणतणावांवर मात करता येणे, हे विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता खूप महत्त्वाचे ठरते.

तसेच प्रत्येकाला व्यक्तीगत मूल्ये जीवनात मार्गदर्शक ठरत असतात. मूल्ये ही अनेकदा आपल्या व्यक्तिमत्वात रूजली जातात व आपल्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनतात. व्यक्तीतील ही मूल्ये आपले निर्णय आणि कृती प्रभावित करत असतात. विदयार्थ्यांतील व्यक्तीगत मूल्ये हे त्यांच्या कृती, शब्द आणि वर्तनातून व्यक्त होत असतात. व्यक्तिगत मूल्ये ही व्यक्तिमत्वाला दिशा देण्याचे कार्य करतात. त्यामुळे व्यक्तीगत मूल्ये ओळखणे व रूजवणे हे व्यक्तिमत्व विकासाकरिता महत्वाचे ठरते. महाविदयालयीन विदयार्थ्यांना त्यांच्या व्यक्तीगत मुल्यांची जाणीव होणे महत्त्वाचे ठरते.

2. संशोधनाची गरज :-

सध्याच्या काळात ताणतणावांचा सामना प्रत्येक व्यक्तीला करावा लागत आहे. त्यापैकी थोडयाच व्यक्ती ताणतणावांचे चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करताना दिसतात. तर ज्या व्यक्तींना ताणतणावांचे योग्य व्यवस्थापन करता येत नाही अश्या व्यक्ती हताश, निराश व मानसिक स्वास्थ व आत्मविश्वास गमावलेल्या दिसतात. अमेरिकेत मानसिक ताण या विषयी झालेल्या संशोधनानुसार 89 टक्के व्यक्ती अत्युच्च ताणाखाली जगत असतात, तर 59 टक्के व्यक्ती आठवडयातून एक ते दोन वेळा मोठया प्रमाणावर ताण अनुभवतात. भारतातील परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. आजच्या स्पर्धेच्या युगात महाविद्यालयीन विद्यार्थीही तणावाखाली जीवन जगत आहेत. काही जणांना तणावाच्या परिस्थितीशी योग्य समायोजन न साधता आल्यामुळे त्यांच्यामध्ये विषमसमायोजन, नैराश्य, व्यसनाधिनता, गुन्हेगारी वर्तन, आत्मविश्वासाची कमतरता, अपयश, आत्महत्या अश्या प्रकारात वाढ होताना दिसून

येत आहे. यशस्वी समायोजन व ताणव्यवस्थापन साधता न आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात देखील अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे परिस्थितीशी सुयोग्य समायोजन साधता येणे, ताणव्यवस्थापन करता येणे महत्त्वाचे ठरते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये याच काळात अनेक व्यक्तिगत मूल्यांचा विकास होत असतो. व्यक्तीगत मूल्ये व्यक्तीला जीवनात मार्गदर्शन करत असतात व व्यक्तिमत्त्वाला दिशा देण्याचे कार्य करत असतात. म्हणून ही मूल्ये ओळखणे, जाणून घेणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. व्यक्तिगत मूल्ये ही व्यक्तीचे ध्येय, व कोणती कृती करावी हे ठरवत असतात. विद्यार्थ्यांना जर स्वतःतील मूल्ये ओळखता आली तर त्यांना त्यांचे करिअर, वैयक्तीक नातेसंबंध टिकवणे व विविध छंद जोपासणे याकामी मार्गदर्शक ठरतील. विदयार्थी त्यांच्या मूल्यांच्या अनुषंगाने विविध कार्यात गुंतल्याने नैराश्य आणि चिंता कमी होण्यास व मानसिक स्वास्थ्य जोपासण्यास मदत होईल. तसेच त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात आत्मविश्वासाने वाटचाल करता येईल. त्यामुळे संशोधकाला याविषयी अभ्यास करणे व संशोधन करणे महत्वाचे वाटल्यामुळे प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेतले आहे.

3. संशोधनाचे महत्त्व :-

1. प्रस्तुत संशोधनामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील समायोजन क्षमता विकसनात मदत होईल

2. प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांना समायोजन साधण्याचे मार्ग समजण्यास मदत होईल.

3. प्रस्तुत संशोधनामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ताणतणावांना सामोरे जाण्याचा दृष्टीकोन विकसित होईल.

4. प्रस्तुत संशोधनामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ताणव्यवस्थापनाच्या पदध्ती समजण्यास मदत होईल.

5. प्रस्तुत संशोधनामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची जोपासना करता येईल.

6. प्रस्तुत संशोधनामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व्यक्तिगत मूल्यांची ओळख / जाण होण्यास मदत मिळेल.

7. प्रस्तुत संशोधनामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील व्यक्तिगत मूल्यांचे विकसन होण्यास मदत होईल.

4. संशोधनाचे विधान :-

"महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मूल्ये विकसन

कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकता - एक अभ्यास ”

5. कार्यात्मक व्याख्या :-

1. महाविद्यालयीन विद्यार्थी –

वय वर्षे 17 ते 24 या वयोगटातील उच्च शिक्षण घेणारे (कनिष्ठ / वरिष्ठ स्तरीय) विद्यार्थी.

उदा. 12 वी , पदवी शिक्षण घेणारे विद्यार्थी.

2. समायोजन –

समायोजन म्हणजे जीवनातील संघर्ष, परिस्थिती, बदल किंवा वातावरणाशी सुयोग्यपणे जुळवून घेणे, तडजोड करणे.

3. ताणव्यवस्थापन –

ताण सुसह्य होण्यासाठी केलेले शारीरिक व मानसिक प्रयत्न. किंवा ताणावर मात करणे, नियंत्रण ठेवणे.

4. व्यक्तिगत मूल्ये –

व्यक्तीच्या कृतींना प्रेरित करणारी व जीवनात मार्गदर्शक तत्त्वे म्हणून दिशा देणारी बाब.

5. विकसन कार्यक्रम –

एखादा निश्चित हेतू साध्य किंवा विकसित करण्यासाठी तयार केलेली योजना.

6. परिमाणकारकता –

परिणामकारकता म्हणजे इच्छित परिणाम उत्पादन करण्याची क्षमता.

6. संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आले आहेत.

1. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांच्या समायोजन व ताणव्यवस्थापन पद्धतींचा शोध घेणे.

2. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मूल्यांचा शोध घेणे.

3. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी समायोजन क्षमता विकसन कार्यक्रमाची निर्मिती

करणे.

4. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ताणव्यवस्थापन क्षमता विकसन कार्यक्रमाची निर्मिती करणे.

5. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिगत मूल्ये विकसन कार्यक्रमाची निर्मिती करणे.

6. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मूल्ये विकसन कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

7. संशोधनाची गृहितके :-

1. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना जीवनात समायोजन साधताना मानसिक संघर्षांना सामोरे जावे लागते.

2. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या जीवनात ताणतणाव निर्माण होत असतात.

3. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना ताणव्यवस्थापन करण्यात व्यक्तिभिन्नता आढळते.

4. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना स्वतःतील व्यक्तिगत मूल्यांची परिपुर्ण कल्पना नसते.

5. योग्य मार्गाने समायोजन व ताणव्यवस्थापन करणारे व्यक्ती जीवनातील समस्यांना आत्मविश्वासाने सामोरे जातात.

6. योग्य समायोजन, ताणव्यवस्थापन करणारे व व्यक्तिगत मूल्यांची जाण असणा-यांचा व्यक्तिमत्त्व विकास योग्य दिशेने होतो.

8. संशोधन परिकल्पना :-

महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मुल्ये विकसन कार्यक्रमांचा समायोजन व ताणव्यवस्थापन यांच्या दृष्टीकोनात सकारात्मक परिमाण दिसून येतो तसेच व्यक्तिगत मूल्ये विकसित होण्यास मदत होते.

9. शून्य परिकल्पना :-

महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मुल्ये

विकसन कार्यक्रमांचा विद्यार्थ्यांच्या समायोजन, ताणव्यवस्थापन यांच्या दृष्टीकोनात तसेच व्यक्तिगत मूल्ये विकसनात सार्थ फरक आढळत नाही.

10. संशोधनाची व्याप्ती :-

1. क्षेत्र व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन मराठवाडयातील बीड जिल्हयापुरते व्यापक आहे.

2. घटक व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन बीड जिल्हयातील अंबाजोगाई तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपुरते व्यापक आहे.

3. आशय व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मूल्ये यांच्याशी व्यापक आहे.

4. कालव्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाच्या कालावधीपुरते (सप्टें 2022 ते सप्टें 2025) व्यापक आहे.

11. संशोधनाच्या मर्यादा :-

1. क्षेत्र मर्यादा :

प्रस्तुत संशोधन बीड जिल्हयातील अंबाजोगाई तालुक्यापुरते मर्यादित आहे.

2. घटक मर्यादा :

प्रस्तुत संशोधन बीड जिल्हयातील अंबाजोगाई तालुक्यातील महाविद्यालयांपुरते मर्यादित आहे.

3. आशय मर्यादा :

प्रस्तुत संशोधन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मूल्ये यांपुरते मर्यादित आहे.

4. कालमर्यादा :

प्रस्तुत संशोधनाच्या कालावधीपुरते (सप्टें 2022 ते सप्टें 2025) मर्यादित आहे.

12. संशोधनाच्या परिमर्यादा :-

1. प्रस्तुत संशोधन हे मराठवाडयातील बीड जिल्हयातील अंबाजोगाई तालुक्यातील पदवीच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी मर्यादित असेल.

2. प्रस्तुत संशोधनात विकसन कार्यक्रमाची निर्मिती ही समायोजन, ताण व्यवस्थापन व व्यक्तिगत मूल्ये यावर आधारित असेल.

3. प्रस्तुत संशोधनातील विकसन कार्यक्रमाची परिणामकारकता तपासणीसाठी पदवीच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा समावेश केला जाईल.

13. समस्येशी निगडीत चले :-

1. स्वाश्रयी चल (स्वतंत्र चले) :

प्रयोगकर्त्याला ज्याचे परिणाम ठरवायचे असतात, ते स्वाश्रयी चले असतात.

प्रस्तुत संशोधनात समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मूल्ये विकसनासाठी राबवलेले उपक्रम हे स्वाश्रयी चले आहेत.

2. आश्रयी चल (परतंत्र चले) :

एखादया क्षमतेचा गृहित परिणाम किंवा कारण म्हणजे आश्रयी चल होय.

प्रस्तुत संशोधनात समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मूल्ये हे आश्रयी चले आहेत.

3. नियंत्रित चले :

प्रस्तुत संशोधनात महाविद्यालयीन विद्यार्थी, वयोगट, वेळ, मार्गदर्शन पद्धती हे नियंत्रित चले आहेत.

14. संशोधन पदधती :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने संशोधाची उद्दिष्टे विचारात घेता सर्वेक्षण व प्रायोगिक पद्धतीची निवड केली आहे.

1. सर्वेक्षण पद्धती :

प्रस्तुत संशोधनात आवश्यक कार्यक्रमाचे निश्चितीकरण करण्यासाठी महाविद्यालयीन

विद्यार्थ्यांच्या समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मूल्ये विषयक अभ्यास सर्वेक्षण पद्धतीने मानसशास्त्रीय चाचण्यांच्या आधारे केला जाईल.

2. प्रायोगिक पद्धती :

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी समायोजन, ताणव्यस्थापन व व्यक्तिगत मूल्ये विकसन कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर केला जाईल. यामध्ये समतुल्य गट करून नियंत्रित व प्रायोगिक गट तयार करून चाचणी घेण्यात येईल.

टप्पे : 1. नियोजन 2. कार्यक्रम निर्मिती

3.अंमलबजावणी 4. परिणामकारकता तपासणी.

15. जनसंख्या व नमुना निवड पद्धती :-

संशोधकाने संशोधनासाठी ज्यातून नमुना निवडला आहे, असे सर्व व्यक्ती म्हणजे जनसंख्या.

1. जनसंख्या :

प्रस्तुत संशोधनामध्ये बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील पदवी महाविद्यालयातील प्रथम वर्षे प्रवेशित सर्व विद्यार्थी हे संशोधनातील जनसंख्या असेल.

2. न्यादर्श / नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनात संशोधक न्यादर्श निवडीसाठी महाविद्यालयीन स्तरावरील पदवी प्रथम वर्षातील कला, विज्ञान, शिक्षणशास्त्र यापैकी एक शाखा निवडून जनसंख्येपैकी 20 टक्के न्यादर्श घेण्यात येईल. त्यातील 60 विद्यार्थी संशोधनासाठी घेणार आहे. त्यापैकी 30 विद्यार्थी प्रायोगिक गटासाठी व 30 विद्यार्थी नियंत्रित गटासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवडण्याचे ठरविले आहे.

16. संशोधन अभिकल्प :-

प्रस्तुत संशोधनातील कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी एकल गट अभिकल्पाचा वापर करण्यात येईल.

17. संशोधनाचा प्रकार :-

प्रस्तुत संशोधन हे उपयोजित संशोधन ह्या प्रकाराशी निगडीत आहे.

18. संशोधनाची साधने :-

संशोधनासाठी विविध प्रकारची माहिती संकलित करावी लागते. ही माहिती संकलित करून कार्यक्रम विकसित करता येतो. प्रस्तुत संशोधनासाठी समायोजन चाचणी, ताणव्यवस्थापन चाचणी, व्यक्तिगत मूल्ये प्रश्नावली व स्वप्रमाणित चाचणीचा उपयोग केला जाईल.

19. सांख्यिकीय परिमाणे :-

माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय परिमाणांची आवश्यकता असते.

प्रस्तुत संशोधनात संख्याशास्त्रीय विश्लेषणासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, टी चाचणी या परिमाणांचा उपयोग केला जाईल.

20. संशोधन कार्यवाहीचे टप्पे :-

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या समायोजन, ताणव्यवस्थापन व व्यक्तिगत मूल्ये विषयक माहिती प्राप्त करून नतंर तज्ज्ञांशी चर्चा करून साधन विकसन, प्रमाणिकरण व कार्यक्रमाची निर्मिती केली जाईल. विकसन कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक पद्धतीनुसार कार्यवाही करून निष्कर्ष काढण्यात येतील.

21. प्रकरणीकरण :-

प्रस्तुत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे प्रकरण योजना करण्यात येईल.

अ.क्र.	प्रकरण	विषय
1	प्रकरण पहिले	प्रस्तावना
2	प्रकरण दुसरे	संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा
3	प्रकरण तिसरे	संशोधनाची कार्यपध्दती
4	प्रकरण चौथे	माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन
5	प्रकरण पाचवे	सारांश, निष्कर्ष व शिफारशी

22. वेळापत्रक :-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक ठरविण्यात आलेले आहे.

अ.क्र.	विवरण	कालावधी
1	समस्या निश्चिती	2 महिने
2	आराखडा निर्मिती व मंजुरी	1 महिने
3	संशोधन साहित्याचा आढावा	6 महिने
4	संशोधन कार्यपद्धती ठरविणे, व साधनांची, उपक्रमांची निर्मिती	8 महिने
5	पथदर्शक अभ्यास	3 महिने
6	उपक्रमांची अंमलबजावणी	3 महिने
7	माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन	3 महिने
8	अहवाल लेखन	3 महिने
9	अहवाल सादरीकरण	1 महिने
	एकुण कालावधी	30 महिने

टिप: संशोधन कार्याच्या स्वरूपावरून कालावधीमध्ये बदल होवू शकतो.

23. खर्चाचे अंदाजपत्रक :-

अ.क्र.	विवरण	अंदाजित खर्च
1	पीएच.डी शुल्क	20500 रू
2	संदर्भ ग्रंथ खरेदी	20,000 रू
3	माहिती संकलन खर्च	16,000 रू
4	डी.टी.पी खर्च	10,000 रू
5	प्रबंध 5 प्रती	20,000 रू
6	झेरॉक्स खर्च	10,000 रू
7	प्रवास खर्च	20,000 रू
8	इतर खर्च	21,000 रू
9	कार्यशाळा,चर्चासत्रे	20,000 रू
10	प्रबंध दाखल शुल्क	5,000 रू
	एकुण	1,62,500 रु

टिप: संशोधन कार्याच्या स्वरूपावरून अंदाजपत्रकामध्ये बदल होवू शकतो.

24. संदर्भग्रंथ सूची :-

1. भिंताडे, वि.व. (1988), शैक्षणिक संशोधन, पुणे: नित्यनुतन प्रकाशन.
2. जगताप, ह.ना. (1988), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे: नित्यनुतन प्रकाशन.
3. पाटील, अनघा. (2011), मॅनेज युवर स्ट्रेस, मुंबई: परचुरे प्रकाशन.
4. Chaturvedi, Ramesh. (2005), Guidance and Counselling Skills, दिल्ली: क्रेसेंट पब्लीकेशन.
5. दांडेकर, वा.ना. (1994), शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र, पुणे: विद्या प्रकाशन.
6. जगताप, ह.ना. (1994), प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान, पुणे: नुतन प्रकाशन.
7. Chaturvedi, Ramesh. (2007), Group Guidance and Counselling Skills, दिल्ली: क्रेसेंट पब्लीकेशन.
8. दुनाखे, अरविंद. (1994), शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे: नित्यनुतन प्रकाशन.
9. http://shodhganga.inflibnet.ac.in/
10. http://inflibnet.ac.in/

संशोधक

इशान रामराव सरवदे

मार्गदर्शिका

डॉ.विशाखा पांडूरंग म्हस्के